देशोन्नती

# सायबर सुरक्षा जनजागृती अभियान



देशोन्नती वृत्तसंकलन

लातूर : येथील राजश्री शाहू विद्यालय, पटेलनगर येथे दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय(स्वायत्त), लातूर आणि क्विक हील फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या ' सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाअंतर्गत दोन विद्यार्थिनी वैष्णवी राजे व प्रतिभा रायफले या विद्यार्थिनी सायबर सुरक्षा आणि ऑनलाईन फसवणूक या विषयावर इ.५ वी ते इ.१० वी. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

क्विक हिल फाउंडेशन यांच्या मार्फत हा कार्यक्रम राबवण्यात आला. सध्याच्या काळात सायबर गुन्हे हे वाढत आहेत. अश्या गुन्ह्यांन पासुन सर्वांनी सावध असले पाहिजे. ऑनलाईन गेम , इंटरनेटचा योग्य वापर, ?प्स ला दिले जाणारे परमिशन,अनोळखी व्यक्तींना माहिती शेअर करणे, चुकीच्या वेबसाईट/ जाहिराती क्लिक करणे यापासुन दूर राहिले पाहिजे असे उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यालयाचे मा. मुख्याध्यापक श्री विकास तोडकर व सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.